**नवी मुंबई महानगरपालिका**
**परवाना विभाग**
**व्यवसाय परवाना नुतनीकरण संबंधी जाहीर आवाहन**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या परवाना विभागामार्फत महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खानावळी / हॉटेल्स / लॉजींग बोर्डींग / केश कर्तनालये / ब्युटी पार्लर / स्वीट मार्ट / दूध व दुग्धजन्य पदार्थ इत्यादीना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 376 अन्वये देण्यात आलेल्या व्यवसाय परवान्यांचे नुतनीकरण दरवर्षी करण्यात येते.

नवी मुंबई महानगरपालिकेने परवाना देण्याची प्रक्रिया पारदर्शी / सुलभ करणेसाठी माहे ऑक्टोबर 2016 पासून ऑनलाईन प्रक्रियेव्दारे परवाना देण्याची सुविधा उपलब्ध केली असून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात आहे.

परवाना नुतनीकरणासाठी सुध्दा ऑनलाईन (Online) संगणक प्रणाली कार्यान्वित करण्यात आली असून सर्व परवाना धारकांनी परवाना नुतनीकरण ऑनलाईन (Online) संगणक प्रणालीव्दारे करण्याचे नवी मुंबई महानगरपालिकेचे धोरण आहे.

तरी, नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील सर्व व्यवसायिकांनी आपला व्यवसाय परवाना नुतनीकरणासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या नमुंमपाचे संकेतस्थळ www.rtsnmmconline.com किंवा www.nmmc.gov.in या ऑनलाईन (Online) संगणक प्रणालीचा लाभ घ्यावा.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने जाहिर आवाहन करण्यात येते की, परवाना नुतनीकरणासाठी अर्जदाराने स्वत: (Online) संगणक प्रणालीवर अर्ज सादर करावेत. दलालामार्फत / कन्सलटंट मार्फत अर्ज सादर करू नयेत. अर्जदाराने व्यक्तीश: ऑनलाईन अर्ज दाखल केल्यानंतर विहीत मुदतीत विभागाकडून व्यवसाय परवान्याच्या नुतनीकरणाची कार्यवाही करण्यात येईल. याची नागरीकांनी नोंद घ्यावी. यात काही अडचणी उदभवल्यास अति. आयुक्त (शहर), नमुंमपा / उप आयुक्त (परवाना), नमुंमपा यांचेशी खालील दुरध्वनी क्रमांकांवर संपर्क साधावा.

दुरध्वनी क्रमांक :- 022-2756 7043 / 2756 7387

**Sd/-**

**उप आयुक्त (परवाना)**
**नवी मुंबई महानगरपालिका**